COAI110701



**शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना**
**आगाऊ वेतनवाढ मंजूर करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक- संकीर्ण-१००७/१०७३/प्र.क्र.१९०/०७/आठ
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- १९.११.२००७.

वाचा : १) शासन परिपत्रक क्रमांक-साप्रवि/क्र.आवेवा-२००६/प्र.क्र.२०८/०६/आठ, दि.१४/१२/२००६.
२) शासन परिपत्रक, साप्रवि क्र.आवेवा-२००७/प्र.क्र.१५१/०७/आठ, दि.१.९.२००७

**शासन परिपत्रक :-**

प्रशासकीय पुर्नरचना समितीने शिफारस केल्याप्रमाणे शासकीय अधिकाऱ्यांना/कर्मचाऱ्यांना त्यांनी सेवेत असताना सातत्याने केलेल्या अतिउत्कृष्ट कामाबद्दल आगाऊ वेतनवाढ/वेतनवाढी मंजूर करण्यासंदर्भात योजना प्रथमतः दि.२६.६.१९७० च्या परिपत्रकान्वये अंमलात आणली आहे. या योजनेसंबंधी तपशीलवार सूचना आणि कार्यपध्दती दि.११.२.१९७४ च्या आदेशान्वये प्रस्तुत करण्यात आल्या. तसेच यानंतर वेळोवेळी या विषयासंदर्भात आदेश निर्गमित केले आहेत या सर्व आदेशातील सूचना व मार्गदर्शक तत्वे विचारात घेऊन सक्षम प्राधिकाऱ्यांनी संबंधित शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना वेळीच आगाऊ वेतनवाढ/वेतनवाढी मंजूर करणे अपेक्षित आहे.

मंत्रालयातील तसेच मंत्रालयाबाहेरील क्षेत्रीय कार्यालये यामधील गट 'अ' ते 'ड' या मधील अधिकारी/कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढ/वेतनवाढी मंजूर करण्याबाबत काय कार्यपध्दती अनुसरावी याबाबत प्रचलीत नियम, शासन परिपत्रक दि.१४.१२.०६ अन्वये एकत्रीत करून सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, विभाग प्रमुख, कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणण्यात आले आहेत. परंतु असे असूनही कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढी मंजूर करताना प्रशासकीय विभागांकडून व विभागप्रमुख/कार्यालय प्रमुखांकडून शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश विचारात घेतले जात नाहीत. अशाच एका प्रकरणात एक मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने आगाऊ वेतनवाढ मंजूरीची कार्यवाही वेळेवर केली नसल्यामुळे एका निवृत्त शासकीय कर्मचाऱ्यावर अन्याय झाल्याचे मा. उप लोकआयुक्त यांनी शासनाच्या निदर्शनास आणले आहे. वास्तविक सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढ मंजूर करण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे दि.४.८.१९९४ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केली आहेत. तथापि, त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचे दिसून आले आहे. बहुतेक विभागांकडून सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचेबाबतही विहित मार्गदर्शक तत्वांचा अवलंब न करता त्यांना देय असलेल्या आगाऊ वेतनवाढीपासून वंचित ठेवण्यात येते. त्याचप्रमाणे प्रशासकीय अकार्यक्षमता झाकण्यासाठी "प्रशासकीय विलंब" या शीर्षाखालील तरतूदीचा चूकीचा अर्थ लावण्यात येतो.

EST-III

आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्याकरीता विलंब होऊ नये, तसेच विलंबामुळे आगाऊ वेतनवाढी मिळाल्या नाहीत तर याकरीता जबाबदार असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी शिफारस मा. उपलोकआयुक्त यांनी शासनास केली आहे. सदर शिफारस लक्षात घेता सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांना असे कळविण्यात येते की, त्यांनी आगाऊ वेतनवाढीच्या प्रस्तावाचा आढावा घेऊन आपल्या विभागातील/कार्यालयातील कोणीही पात्र अधिकारी/कर्मचारी (सेवा निवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांसह), आगाऊ वेतनवाढीसाठी विचार होण्यापासून वंचित राहणार नाहीत, तसेच वेतनवाढी मंजूर करण्याची कार्यवाही करताना प्रशासकीय विलंबासह कोणताही विलंब होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच जर पात्रता असूनही असे अधिकारी/कर्मचारी आगाऊ वेतनवाढीसाठी विचार होण्यापासून वंचित

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
शाखा:- ESI
आ.क्र नं.:-

2
44LLE

राहीले तर त्याची जबाबदारी सदर प्रकरण हाताळणाऱ्या संबंधित विभागाच्या आस्थापना शाखेच्या अधिकाऱ्यांची राहील व सदर अधिकारी शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील.

सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग तसेच त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांनी आगाऊ वेतनवाढीचे प्रस्ताव मंजूर करताना वरील सर्व सूचनांचे यथायोग्य काटेकोरपणे पालन होत असल्याची दक्षता घ्यावी आणि सर्व पात्र अधिकारी/कर्मचाऱ्यांना (सेवा निवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांसह) विहित मुदतीतच आगाऊ वेतनवाढीचे लाभ दिले जात आहेत याची खातरजमा करुन घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( वि.द.आठवले )
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

* राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
मुख्य मंत्री यांचे प्रधान सचिव,
उप मुख्य मंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री/राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद) मुंबई,
* राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई,
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक (निवासी लेखे) कोकण भवन, नवी मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
निरनिराळया मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.
* पत्राने.

--------- Keep with S.O. File